दिनांक 27/11/2025

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक** - श्रीमती लता दराडे, पोलीस हवालदार, पो.स्टे.दौलताबाद यांनी तक्रारदार यांच्या कडुन 20,000/- (वीस हजार रुपये) लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे पुंडलीकनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्रीमती लता बाळासाहेब दराडे , वय 37 वर्ष, पोलीस हवालदार, नेमणुक दौलताबाद पोलीस स्टेशन , छत्रपती संभाजी नगर, रा. एमरॉड सिटी, घर. नं.36 गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 20,000/- (वीस हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 20,000/- (वीस हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. बाळासाहेब शिंदे, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि. छत्रपती छत्रपती संभाजीनगर<br>श्रीमती.संगीता पाटील, पोलीस उप अधीक्षक ला प्र वि छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार हिच्या पतीने तीच्या विरुद्ध व तीचे मित्र राहुल यांच्या विरूद्ध पो. स्टे. दौलताबाद येथे तक्रारी अर्ज दाखल केला होता त्याच्यावर कार्यवाही न करण्यासाठी व त्यात मदत करण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार यांचे कडे लाचेची मागणी केली. |
| थोडक्यात माहिती | दिनांक 26/11/ 2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंचा समक्ष आलोसे पोलीस हवालदार लता दराडे यांच्याकडे तक्रारदार व तिचे मित्र राहुल यांना पाठवुन पडताळणी केली असता आलोसे पो. ह. लता दराडे यांनी तक्रारदार व तिचे मित्र राहुल यांच्याकडे प्रत्येकी 10,000/- रूपये असे एकूण 20,000/-(वीस हजार रुपये) रूपयांची मागणी करुन दि. 27/11/2025 स्वीकारण्याचे कबूल केले.<br>दिनांक 26/11/2025 रोजी आलोसे पो.ह. दराडे यांच्या लाच मागणी पडताळणी नंतर दि. 27/11/2025 रोजी शासकीय पंचा समक्ष पो स्टे.या ठिकाणी सापळा कार्यवाही अजमावली असता आलोसे पो.ह. लता दराडे ह्या तेथे मिळून न आल्याने त्यांना तक्रारदार व तिचे मित्र राहुल यांनी फोन लावून विचारले असता त्यांनी त्यांच्या राहत्या घरी बोलून घेतले त्याच्यांविरूध्द असलेल्या तक्रारी अर्जावर कार्यवाही न करण्यासाठी व मदत करण्यासाठी प्रत्येकी 10000/- रूपये असे एकूण 20000/-(वीस हजार रुपये) रूपये स्विकारले असता सापळा पथकाने ताब्यात घेतले आहे.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस ठाणे पुंडलीकनगर, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. नमुद गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक, श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री.सुरेश नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री.बाळासाहेब शिंदे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस उप अधीक्षक श्रीमती.संगीता पाटील, पो.ह.दिपक इंगळे, पो.अंम सचिन बारसे, राम गोरे, सी. एन बागुल ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986 व्हॉटसॲप क्रमांक :- 7720891064

सुरेश इ. नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर